सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
RNI. NO. MAHBIL /25/A0192
# ग्लोबल महातेज
https://epaper.globalmahatej.com/
Postal Regd. No. JAL/443/2025-2027
वर्ष १ ले | अंक : ३४१ | गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १,४८,००० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १,३७,५०० |
| १८ सोने ७५.००% | ₹ १,१४,५०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २,३२०/- |

भाव प्रती १० ग्राम

# अमळनेरात डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करा!

## एसपी श्रीकांत धिवरे यांचे आवाहन; 'यंदा एकही गुन्हा दाखल होणार नाही' याचा संकल्प करा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गणेशोत्सवाच्या काळात क्षुल्लक कारणांवरून तरुणांवर गुन्हे दाखल होतात. एकदा गुन्हा दाखल झाल्यानंतर भविष्यातील अनेक संधींचे दरवाजे बंद होतात. त्यामुळे तरुणांनी विशेष काळजी घ्यावी. उत्सवाचे विकृतीकरण न होता त्याचे संस्कृतीकरण व्हावे, ही शासनाची भूमिका आहे. यंदा अमळनेरात डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचा संकल्प सर्वांनी करावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी केले.गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वाणी मंगल कार्यालयात शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.

एसपी धिवरे म्हणाले, की राज्य शासनाने गेल्या दोन वर्षांपासून गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव'चा दर्जा दिला आहे. त्यामुळे हा उत्सव संस्कृती व परंपरेचे जतन करणारा असला पाहिजे. अमळनेर पालिकेने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्ते, वीज वाहिन्या आणि इतर आवश्यक बाबींकडे लक्ष द्यावे. अमळनेर पोलीस विभागाने उत्सवासाठी परिपूर्ण तयारी केली आहे. यंदाही चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. हा बंदोबस्त नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शहराच्या शांततेसाठी आहे. त्यामागे कोणताही वेगळा हेतू नाही.

**'मागील वर्षी जिल्ह्यात एकच गुन्हा दाखल झाला; यंदा एकही नको'**

गेल्या वर्षी जळगाव जिल्ह्यात गणेशोत्सवाच्या काळात एकच गुन्हा दाखल झाला होता. यंदा अमळनेरसह जिल्ह्यात एकही गुन्हा दाखल होणार नाही, याचा संकल्प सर्वांनी करावा. हे शहर आपले आहे. त्यामुळे गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करण्याची जबाबदारी सर्वांची आहे.

गणेशोत्सवाच्या काळात यापूर्वी काही आकस्मिक घटना घडल्या आहेत. काहींना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे उत्सव काळात मद्यपान टाळावे. गणेशमूर्ती विक्रीच्या ठिकाणी वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. मूर्ती स्थापना करण्यापूर्वी प्रशासनाच्या आवश्यक त्या परवानग्या घ्याव्यात. मंडपाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. रात्री किमान एका कार्यकर्ता मंडपात असावा. पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी.



शहरातील वाणी मंगल कार्यालयात गणेशोत्सवानिमित्त आयोजित शांतता समितीच्या बैठकीप्रसंगी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, पोलीस उपअधीक्षक अशोक नखाते, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, मुख्याधिकारी गणेश शिंदे आणि नायब तहसीलदार सी. यू. पाटील. तसेच शहरातील शांतता समिती सदस्य, आजी माजी नगरसेवक, गणेश मंडळ पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, राजकीय सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी, मोहल्ला कमेटि सदस्य, महिला दक्षता सदस्य, पोलीस पाटील, पत्रकार बांधव आदी.

### सोशल मीडियावर आक्षेपार्ह संदेश टाळा

इतर धर्मीयांच्या भावना दुखावतील किंवा आक्षेप निर्माण होतील, असे संदेश सोशल मीडियावर प्रसारित करू नका, असे आवाहनही एसपी धिवरे यांनी केले.दरम्यान, प्रविण पाटील यांनी डीजेबाबत कारवाईची भूमिका काय असेल, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर एसपी धिवरे यांनी अलीकडील कानबाई उत्सवादरम्यान काही जण ट्रकवर कपडे काढून नाचत होते तसेच इतर वाहनांवर पाणी उडवत होते, या प्रकाराबाबत नाराजी व्यक्त केली. अशा प्रकारांना उत्सवाचे स्वरूप देऊ नका, अशी विनंतीवजा तंबी त्यांनी दिली.

### अमळनेर हद्दीत १४८, मारवडमध्ये ३७ गणेश मंडळांची स्थापना

डीवायएसपी विनायक कोते यांनी गणेश विसर्जनाच्या नियोजनाची माहिती दिली. अमळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत १४८, तर मारवड पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३७ गणेश मंडळांची स्थापना होणार आहे. अमळनेर तालुक्यात पाचवा, सातवा, नववा आणि अकरावा दिवस अशा विविध दिवशी गणेश विसर्जनाची परंपरा आहे. त्यानुसार पोलिसांकडून बंदोबस्ताचे नियोजन करण्यात येत असल्याचे कोते यांनी सांगितले. उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांनी गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन केले. पारंपरिक वाद्यांचा वापर करावा आणि मोठ्या आवाजातील डीजे टाळावा, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच मुरूम परवानगीसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आवश्यक कार्यवाही करून देण्याचे त्यांनी सांगितले. मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी नगरपरिषदेच्या वतीने गणेशोत्सव तसेच आगामी गोगा नवमीसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. गणेश विसर्जनाच्या मार्गावरील तसेच गोगा नवमीच्या प्रमुख रस्त्यांची दुरुस्ती आणि खड्डे बुजविण्याचे काम करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

**सर्व पत्रकार संघाच्या उपक्रमाचे एसपींकडून कौतुक**

गेल्या तीन वर्षांपासून गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडावी यासाठी दगडी दरवाजाजवळ पत्रकारांच्या वतीने स्वागत मंच उभारून प्रशासनाला सहकार्य केले जाते. यंदाही हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार संघाचे अध्यक्ष चेतन राजपूत यांनी दिली. या उपक्रमाचे एसपी धिवरे यांनी कौतुक करत त्यास परवानगी दिली. विक्रांत पाटील यांनी शहरातील रस्त्यांवरील खड्डे तसेच मुरूम परवानगी मिळत नसल्याची अडचण बैठकीत मांडली. बैठकीनंतर मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी रस्त्यांची पाहणी केली. नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी रस्ते दुरुस्तीचे आश्वासन दिले.

प्रविण पाटील, दिनेश शेलकर, नितीन भदाणे, शकील काझी, रणजित शिंदे आदींनी ही मनोगते व्यक्तत केली. यावेळी शांतता समिती सदस्य, आजी-माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस पाटील, गणेश मंडळांचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील वाहतूक, मिरवणुकीचे मार्ग, वीज व्यवस्था, स्वच्छता, विसर्जन व्यवस्था आणि पोलीस बंदोबस्ताबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

सूत्रसंचालन संजय पाटील यांनी केले, तर आभार पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी मानले

आजचे
अभीष्टचिंतन



श्री. शुभम महाराज
मुख्य पुरोहित, मंगळग्रह मंदिर



श्री. मयूर चौधरी
अमळनेर



श्री. संजय पाटील
फोटोग्राफर



श्री. मनीष चौधरी
मंगल सेवेकरी

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

### रक्षाबंधनानंतर सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण

### कारल्यासोबत 'या' भाज्या खाणे टाळा




पान २ वर

# काचेच्या शोकेसमधील चमक पाहून भेसळीकडे दुर्लक्ष?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात भेसळयुक्त दूध आणि दुग्धजन्य मेवा, मिठाई आदी पदार्थांवर वेळोवेळी काही किरकोळ स्वरुपाच्या कारवाया झाल्या आहेत. मात्र आकर्षक दुकान, काचेच्या शोकेसमधील चमकदार मांडणी आणि पदार्थांचे मोहक स्वरूप पाहून त्यांची गुणवत्ता चांगलीच असेल असे समजण्याची ग्राहकांची मानसिकता कायम राहीली आहे. अन्नपदार्थांची गुणवत्ता, निर्मिती प्रक्रिया आणि सुरक्षिततेपेक्षा केवळ चव व आकर्षकता महत्त्वाची ठरत असेल, तर ही बाब अमळनेरकरांच्या आरोग्याच्या दृष्टीने चिंताजनक आहे.

अलीकडे भेसळयुक्त दूध तयार करण्याच्या प्रकारावरही कारवाई झाल्याने अन्नभेसळीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. त्यामुळे नागरिकांनी केवळ



प्रशासनाच्या कारवाईची वाट न पाहता, आपण नेमके काय खात आहोत? त्याची गुणवत्ता कशी आहे? त्याचा आपल्या आरोग्यावर भविष्यात काय दूषपरिणाम होऊ शकतो, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. पान २ वर

### झटपट श्रीमंतीसाठी भूमिपुत्रांच्या आरोग्याला मुठमाती

काही जण परराज्यातून येऊन येथील मातीच्या माणसांच्या जीवावर व्यवसाय करतात आणि श्रीमंत होतात. मात्र, व्यवसाय करताना भेसळ व बेइमानी करून त्यातून प्रचंड पैसा कमावतात. अशा प्रकारे ते लोक येथील मातीच्या माणसांच्या आरोग्याला मूठमाती देण्याचे काम करतात.कित्येक वर्षांपासून भूमिपुत्रांच्या आरोग्याशी हा जीवघेणा खेळ सुरू आहे. श्री. तुकाराम मुंढे यांनी भेसळीविरोधात सक्त कारवाईची मोहीम सुरू केली नसती, तर भविष्यातही येथील भूमिपुत्रांच्या आरोग्याची पार माती झाली असती, हे निश्चित. पूर्वी या मंडळींच्या मिठायांच्या दुकानात भरभरून मिठाया दिसत होत्या आता मात्र दुग्धजन्य मिठायांचे दिसणे जवळपास नाहीसे झाले आहे.

# झिरो बॅलन्स अन् तुफान राडा, 'स्मार्ट' कार्डचा एसटीत धुराळा

## एनसीएमसी कार्डअसूनही प्रवाशांचा सवलतविना प्रवास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : एसटीचा प्रवास अधिक 'स्मार्ट' आणि सुलभ करण्यासाठी महिला तसेच ६५ ते ७५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड (एनसीएमसी) अनिवार्य करण्यात आले; मात्र पहिल्याच दिवशी या 'स्मार्ट' कार्डनेच प्रवाशांचा प्रवास 'अस्मार्ट' करून टाकला. कार्ड असूनही स्कॅन न होणे, टॉप-अप केलेली रक्कम दिसत नसणे, 'झिरो बॅलन्स' दाखविणे अशा तांत्रिक अडचणींमुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. काही ठिकाणी वाहक आणि प्रवाशांमध्ये कार्ड नसल्याने वादावादीचे प्रसंगही घडले.

शासनाच्या १ सप्टेंबरपासून सवलतीत एसटी प्रवास करणाऱ्या महिला आणि ६५ ते ७५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्ह्यातील साडेचार लाखांहून अधिक लाभार्थी प्रवाशांनी कार्ड सोबत ठेवले. कार्डमध्ये आवश्यक रक्कम टॉप-अप करून प्रवासासाठी तयारी केली. मात्र प्रत्यक्ष प्रवासाच्या पहिल्याच दिवशी अनेकांना या कार्डच्या तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला.

**टॉप-अप केले, तरी 'बॅलन्स झिरो'**

एनसीएमसी कार्डमध्ये प्रवासासाठी पैसे टॉप-अप करून ठेवलेल्या अनेक प्रवाशांना आणखी एका समस्येला सामोरे जावे लागले. टॉप-अप केलेली रक्कम असूनही वाहकाच्या मशिनवर कार्ड तपासताना 'झिरो बॅलन्स' दिसत असल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला. पैसे भरले आहेत, मग खात्यात शिल्लक रक्कम का दिसत नाही, असा सवाल त्यांनी केला.

**कार्ड असूनही स्कॅन होईना!**

१) बसप्रवासात वाहकाकडील मशिनवर एनसीएमसी कार्ड स्कॅन केल्यानंतर सवलतीच्या प्रवासाची नोंद होणे अपेक्षित आहे. मात्र अनेक प्रवाशांचे कार्ड स्कॅनच होत नसल्याने वाहकांचीही कोंडी झाली. कार्ड स्कॅन होत नसल्यास सवलतीचा प्रवास कसा द्यायचा, हा प्रश्न वाहकांसमोर उभा राहिला.

२) नोकरीच्या दृष्टीने कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी काही वाहकांनी 'पूर्ण भाडे द्या किंवा बसमधून उतरावे लागेल', अशी भूमिका घेतली. मात्र यामुळे महिला प्रवाशांमध्ये संतप्त झाल्या.

३) 'कार्ड आमच्याकडे आहे, मग रस्त्यात कसे उतरवाल?' असा सवाल काही महिलांनी केल्याने अनेक ठिकाणी बसमध्येच वादाचे प्रसंग निर्माण झाले.



# अखंड सुख की प्राप्ती'वर संतांचे मार्गदर्शन; अमळनेरमध्ये संत पारायण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर श्रावण मासानिमित्त येथील बीएपीएस स्वामिनारायण मंदिरात संत पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. येथील बीएपीएस स्वामिनारायण सत्संग मंडळ, यांच्या वतीने २ ते ६ सप्टेंबरदरम्यान दररोज रात्री ८ वाजता संत पारायण सुरू झाले आहे.

या पारायणात 'अखंड सुख की प्राप्ती' या विषयावर प्रवचन होत आहे. यासाठी येथील पूज्य अखंडमुनी स्वामी आणि सारंगपूर येथील पूज्य उत्तमसंकल्प स्वामी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

संत पारायणाच्या माध्यमातून भाविकांना आध्यात्मिक विचार, भक्ती आणि जीवनातील अखंड सुखाचा मार्ग याविषयी मार्गदर्शन मिळत आहे. या धार्मिक कार्यक्रमाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दरम्यान, पवित्र श्रावण मासातील एकूणच वातावरण निर्मितीमुळे सदर पारायणाचा लाभ घेण्यासाठी शहरासह तालुक्यातुनही मोठ्याप्रमाणावर भाविक श्री स्वामीनारायण मंदिरात येत आहेत. त्यामुळे मंदिरात मोठ्याप्रमाणावर भाविक दिसून येत आहेत.



## संपादकीय

### पदव्यांचा डोंगर

भारतात आज पदवीधरांची संख्या विक्रमी पातळीवर (Education) पोहोचली आहे. गल्लीबोळांत महाविद्यालयांचे पेव फुटले आहे आणि वर्षागणिक लाखांच्या घरात तरुण हातात पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्राची सुरकुतलेली वही घेऊन बाहेर पडत आहेत. विद्यापीठाच्या सुरक्षित वातावरणातून बाहेर पडताना त्यांच्या डोळ्यात उज्ज्वल भविष्याचे स्वप्न असते खरे पण या तथाकथित शिक्षणाचा (Education) देशाच्या श्रम बाजाराशी खरोखर काही संबंध उरला आहे का? असा प्रश्न जर विद्वानांनी स्वतःला विचारला तर त्याचे उत्तर निश्चितच नकारात्मक असेल. नीती आयोगाचा अलीकडचा रीइमॅजिनिंग स्किलिंग फॉर विकसित भारत २०४७ हा अहवाल या प्रश्नाचे जे उत्तर देतो, ते अंगावर काटे आणणारे आहे. देशातील ८ कोटी ७० लाख तरुण ना शिक्षण घेत आहेत, ना कोणता रोजगार करत आहेत आणि ना कोणते व्यावसायिक प्रशिक्षण घेत आहेत. तसेच ८.२५ टक्के पदवीधर अशा नोकऱ्यांमध्ये आहेत, ज्या त्यांच्या शैक्षणिक पात्रतेशी सुसंगत आहेत. उरलेले तरुण काय करत आहेत? एकतर ते त्यांच्या शिक्षणाशी काहीही संबंध नसलेली कामे करत आहेत किंवा बेरोजगारीच्या उंबरठ्यावर खितपत पडले आहेत. हा केवळ बेरोजगारीचा प्रश्न नाही; हा आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या अपुरेपणाचा, दूरदृष्टीच्या अभावाचा, धोरणशून्यतेचा आणि एकूणच ढिसाळपणाचा जळजळीत पुरावा आहे. सध्या देशात उच्च शिक्षणात ४.३४ कोटी विद्यार्थी नोंदणीकृत आहेत. एकट्या बी.ए.साठी १.१३ कोटी तरुण रांगेत आहेत, तर बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. मिळून हा आकडा दोन कोटींच्या पार जातो. पण या पारंपरिक पदव्यांचे मूल्य काय? पदवी घेतली की सरकारी नोकरीची परीक्षा देता येते एवढाच एक मर्यादित दृष्टिकोन आज या पदव्यांमागे उरला आहे.

नोव्हेंबर २०२४ ते जुलै २०२५ या अवघ्या आठ-नऊ महिन्यांच्या काळात केवळ ५५ हजार सरकारी जागांसाठी तब्बल १.८६ कोटी अर्ज आले, ही आकडेवारीच सांगते की तरुण किती हताश आहेत. बी.ए. अर्थशास्त्र झालेला तरुण कंपनीचे फायनान्स सांभाळू शकत नाही, बी.कॉम. झालेला मुलगा टॅली किंवा ॲडव्हान्स एक्सेल चालवू शकत नाही आणि राज्यशास्त्राचा पदवीधर साधे धोरणात्मक विश्लेषण करू शकत नाही, अशी ओरड आहे व उदाहरणेही दिली जातात.मग या कागदी पदव्यांचा खरेच उपयोग आहे का? त्यांना वर्षानुवर्षे (Education) जे शिकवले जाते आहे ते भविष्यात त्यांच्या कितपत उपयोगी पडणार आहे किंवा मुळातच त्याचा उपयोग तरी होणार आहे का, याचा कुठेही विचार होताना दिसत नाही. मध्यंतरी एक चमत्कारिक माहितीही कानावर आली. त्यानुसार मुलांचे ज्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतले जातात आणि तो अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी बाहेर पडतात तो अभ्यासक्रमच मुलांना नोकरीसाठी तयार करत नाही; आणि उद्योजक बनण्यासाठी तर अजिबातच नाही अशी स्पष्टोक्तीच ऑफ द रेकॉर्ड देण्यात आली. याचा अर्थ तुम्ही प्रवेश घ्या, फी भरा आणि पदवीचे बेंडोळे तेवढे शिक्षण संस्थांकडून घ्या, त्याचा नोकरीच्या अथवा उद्योगाच्या बाजारात काही उपयोग होईल याची कोणतीही हमी व जबाबदारी या संस्थांची नाही आणि अभ्यासक्रम तयार करणाऱ्यांची तर नाहीच नाही. नोकरी-उद्योगाचे ज्याने त्याने आपापल्या पात्रतेवर आणि वकुबावार पाहावे. नीती आयोगाच्या अहवालानुसार ८० टक्के विद्यार्थ्यांनी मान्य केले आहे की, त्यांच्या अभ्यासक्रमात प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि उद्योगांशी संपर्क नावालाही नव्हता. ३४ टक्के तरुणांना कौशल्यांची कमतरता जाणवते, तर १८ टयांना साधी मुलाखत कशी द्यावी हेही माहीत नसते. कॉलेजच्या चार भिंतींत पुस्तकांचा रट्टा मारून मिळालेली पदवी म्हणजे रोजगाराची गॅरंटी ही कल्पनाच आता पूर्णपणे लयाला गेली आहे.

उद्योगजगताची गरज वेगळी आहे आणि आपल्या विद्यापीठांचे जुनाट अभ्यासक्रम वेगळ्याच जगात वावरत आहेत. आजच्या डिजिटल आणि तंत्रज्ञानाच्या युगातही आपण २०-२५ वर्षे जुनाट विषय विद्यार्थ्यांना शिकवत आहोत. प्राध्यापकांना स्वतःला उद्योगांचा कोणताही अनुभव नसतो, तर महाविद्यालयांकडे आधुनिक प्रयोगशाळा किंवा पायाभूत सुविधा नाहीत.संशोधनाच्या नावाने आनंदी आनंदच आहे. केवळ आणखी महाविद्यालये काढणे किंवा पदव्या वाटणे हा यावरचा उपाय नक्कीच नाही. नीती आयोगाने जो रोडमॅप मांडला आहे, त्याची तातडीने आणि कठोर अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे. उच्च शिक्षणाला थेट उद्योगांशी जोडावे लागेल. उद्योगांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम दरवर्षी अपडेट झाले पाहिजेत.महाविद्यालयांमध्ये केवळ पुस्तकीज्ञान न देता प्रत्यक्ष उद्योगांच्या सहकार्याने प्रयोगशाळा आणि लाइव्ह प्रोजेक्ट्स सुरू केले पाहिजेत. प्रत्येक पदवी अभ्यासक्रमात किमान ६ महिने ते १ वर्षाची प्रत्यक्ष कामाची सक्ती केली पाहिजे. केवळ कागदी प्रमाणपत्र चालणार नाही; विद्यार्थ्याला प्रत्यक्ष काम करता आले पाहिजे. शिक्षण संस्थांना आधुनिक रूप देऊन तरुण पिढीला विशिष्ट कौशल्यांमध्ये पारंगत केले पाहिजे.भारताकडे सध्या जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या आहे. पण जर या जनसांख्यिकीय लाभांशाचे ज्याला डेमोग्राफिक डिव्हिडंड म्हणतात त्याचे आपण वेळेत कौशल्यांमध्ये रूपांतर केले नाही, तर त्याचे रूपांतर एका (Education) महाभयंकर सामाजिक आणि आर्थिक आपत्तीत अर्थात डेमोग्राफिक डिझास्टरमध्ये व्हायला वेळ लागणार नाही. आता केवळ पदव्या वाटण्याची वेळ उरलेली नाही, तर हाताला कौशल्य आणि मेंदूला व्यावहारिक ज्ञान देण्याची वेळ आहे. शिक्षण व्यवस्थेची ही मोडकळीस आलेली इमारत आपण वेळीच दुरुस्त करायला हवी. नाही तर 'विकसित भारत २०४७' हे केवळ एक स्वप्नच राहून जाईल!

# रक्षाबंधनानंतर सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण

## चार दिवसांत सोन्याचे दर ५,९७४ रुपयांनी, तर चांदी १३,३९० रुपयांनी स्वस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जळगावच्या सुवर्ण बाजारपेठेत रक्षाबंधनानंतर सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. अवघ्या चार दिवसांत २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम ५ हजार ९७४ रुपयांनी, तर चांदीचा दर प्रति किलो १३ हजार ३९० रुपयांनी कमी झाला. त्यामुळे सणासुदीच्या आणि आगामी लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर खरेदीदारांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, पुढील काळात दर आणखी घसरणार की पुन्हा वाढणार, याबाबत बाजारात अनिश्चितता कायम आहे.

जळगावमध्ये २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या दिवशी तीन टक्के जीएसटीसह २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम १ लाख ६४ हजार २८५ रुपये होता. चार दिवसांत त्यात ५ हजार ९७४ रुपयांची घट होऊन १ सप्टेंबर रोजी हा दर १ लाख ५८ हजार ३११ रुपयांवर आला. चांदीच्या दरातही मोठी घसरण झाली. २८ ऑगस्ट रोजी जीएसटीसह प्रति किलो २ लाख ५४ हजार ४१० रुपये असलेली चांदी १ सप्टेंबरपर्यंत २ लाख ४१ हजार २० रुपयांवर आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना गरज नसताना सोने खरेदी न करण्याचे आवाहन केले आहे. यापूर्वीच्या अशाच आवाहनानंतर देशांतर्गत सोन्याच्या विक्रीत सुमारे २० टक्के घट झाल्याचे बाजारातील सूत्रांकडून सांगण्यात आले होते. त्यामुळे यावेळीही या आवाहनाचा ग्राहकांच्या खरेदीच्या निर्णयावर कितपत परिणाम होतो, याकडे सुवर्ण बाजाराचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, सध्याच्या घसरणीमागे केवळ देशांतर्गत मागणीतील बदल कारणीभूत



नसून आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींचाही प्रभाव असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाली असून, त्यामुळे जागतिक महागाईची चिंता पुन्हा वाढली आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या व्याजदरविषयक भूमिकेकडे गुंतवणूकदारांचे लक्ष आहे. अमेरिकेतील उत्पादन व सेवा क्षेत्राची आकडेवारी तसेच रोजगार बाजाराशी संबंधित आगामी अहवालातून अर्थव्यवस्थेची स्थिती स्पष्ट होण्याची शक्यता आहे. त्याचा फेडरल रिझर्व्हच्या व्याजदर धोरणावर आणि परिणामी सोन्या-चांदीच्या दरावर परिणाम होऊ शकतो.

याशिवाय कच्च्या तेलाच्या किमती, डॉलरची स्थिती आणि आंतरराष्ट्रीय राजकीय तणाव हे घटकही महत्त्वाचे ठरणार आहेत. त्यामुळे सध्याची घसरण कायम राहणार की बाजारात पुन्हा तेजी येणार, याकडे ग्राहक आणि गुंतवणूकदारांचे लक्ष आहे. खरेदीचा निर्णय घेताना पुढील काही दिवसांतील आर्थिक आकडेवारी आणि बाजारातील दरांची दिशा पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## गरज नसेल तर सोने खरेदी करू नका; पंतप्रधान मोदींचे आवाहन

भारताने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत ७.८ टक्के जीडीपी वाढ नोंदवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांचे अभिनंदन केले. या आर्थिक प्रगतीचा वेग कायम ठेवण्यासाठी 'स्वदेशी', 'व्होकल फॉर लोकल' आणि आत्मनिर्भरतेला प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले.


पंतप्रधान मोदी यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडिओद्वारे भारताच्या आर्थिक प्रगतीवर भाष्य केले. जग युद्ध, विविध संकटे आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांचा सामना करत असतानाही भारताची अर्थव्यवस्था वेगाने पुढे जात असल्याचे त्यांनी सांगितले. ७.८ टक्के आर्थिक वाढ ही देशवासीयांची मेहनत, संकल्पशक्ती आणि सामूहिक सामर्थ्याचे प्रतिबिंब असल्याचे मोदी यांनी म्हटले.

जागतिक पातळीवर युद्धजन्य परिस्थिती, कोविडनंतरची अस्थिरता आणि पुरवठा साखळीतील अडथळे कायम असतानाही भारताने आर्थिक वाढ साध्य केली आहे. या पार्श्वभूमीवर विकासाची ही गती कायम ठेवण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

देशात निराशेचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न काही घटकांकडून होत असल्याचा आरोपही मोदी यांनी केला. मात्र, प्रतिकूल परिस्थितीतही भारताची अर्थव्यवस्था मजबूतपणे पुढे जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

आत्मनिर्भर भारतासाठी देशवासीयांनी स्वदेशी उत्पादनांना प्राधान्य द्यावे आणि स्थानिक व्यवसाय व सेवांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन मोदी यांनी केले. अनावश्यक परदेश प्रवास टाळून देशांतर्गत पर्यटनाला प्रोत्साहन देण्याचे आवाहनही त्यांनी केले. विवाहसोहळे परदेशात करण्याऐवजी भारतातच करण्याचा सल्ला देताना, गरज नसेल तर सोने खरेदी करू नका, असेही त्यांनी स्पष्ट केले.

देशांतर्गत उत्पादन आणि व्यवसायांना चालना मिळाल्यास भारताची आर्थिक ताकद आणखी वाढू शकते, असा संदेश मोदी यांनी दिला. २०४७ पर्यंत विकसित भारताचे लक्ष्य साध्य करण्यासाठी आजच्या पिढीने देशाच्या विकासात योगदान देण्याचे आवाहनही त्यांनी केले. सरकारची धोरणे योग्य असून त्यामागील उद्देश स्पष्ट असल्याचे सांगत, देशातील १४० कोटी नागरिकांच्या सामूहिक शक्तीच्या जोरावर भारत नव्या उंचीवर पोहोचेल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.





*अमळनेर येथील रॉयल इलेक्ट्रॉनिकचे संचालक श्री. सत्यपाल निरंकारी यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दै. ग्लोबल महातेजचे ब्युरो चीफ रजनीकांत पाटील व सोबत जितेंद्र साळुंखे.*

# अमळनेर तहसीलदारपदाचा अतिरिक्त कार्यभार उमा ढेकळेंकडे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील तहसीलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार तहसीलदार (सं.गा.यो.) उमा ढेकळे यांच्याकडे सोपविण्याचे आदेश जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी १ सप्टेंबर रोजी काढले आहेत. यापूर्वी हा अतिरिक्त कार्यभार तहसीलदार (आस्थापना) ज्योती वसावे यांच्याकडे होता. तो त्यांच्याकडून काढून श्रीमती. ढेकळे यांच्याकडे पुढील आदेश होईपर्यंत सोपविण्यात आला आहे.

दरम्यान, श्रीमती. उमा ढेकळे यांच्याकडे असलेला सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार ज्योती वसावे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तसेच श्रीमती. ढेकळे यांच्याकडे असलेला तहसीलदार (सर्वसाधारण), जळगाव पदाचा अतिरिक्त कार्यभार तहसीलदार (कुळकायदा) विजय सूर्यवंशी यांच्याकडे देण्यात आला आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या मूळ पदाचा कार्यभार सांभाळून नव्याने सोपविण्यात आलेला अतिरिक्त कार्यभार तात्काळ स्वीकारावा, तसेच पुढील आदेश होईपर्यंत तो सांभाळावा, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. येथे पूर्णवेळ तहसिलदारांची लवकरात लवकर नियुक्त व्हावी अशी व्यापक मागणी होत आहे.

# कारल्यासोबत 'या' भाज्या खाणे टाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कारल्याची भाजी पाहिली की अनेकजण तिच्या कडू चवीमुळे नाक-तोंड मुरडतात; पण चव कडू असली तरी कारले आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक भाजी मानली जाते. कारल्यामध्ये विविध जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स आढळतात, त्यामुळे आहारात योग्य प्रमाणात कारल्याचा समावेश केल्यास आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.

कारले हे कडू चवीचे असले तरी पोषणमूल्यांबाबत अत्यंत समृद्ध भाजी आहे. कारल्यामध्ये फायबर, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, फोलेट, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि लोह यांसारखी विविध पोषकतत्त्वे आढळतात. याशिवाय त्यात अँटीऑक्सिडंट्सही असतात, जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करण्यास मदत करतात. कारल्यातील फायबर पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास आणि पोट जास्त वेळ भरलेले राहण्यास मदत करू शकते. त्यामुळे कडू चवीमुळे कारले आवडत नसले तरी त्यातील पोषकतत्त्वांमुळे त्याचा आहारात योग्य प्रमाणात समावेश करणे फायदेशीर ठरू शकते.

**कारल्यासोबत कोणत्या भाज्या टाळाव्यात?**

अतितिखट भाज्या, मिरची, लाल मिरचीचा भरपूर वापर कारले स्वतःच कडू आणि काहींना पचायला जड वाटू शकते. त्यासोबत भरपूर हिरवी किंवा लाल मिरची वापरल्यास काही लोकांना छातीत जळजळ, आम्लपित्त किंवा पोटात अस्वस्थता जाणवू शकते.

**जास्त तेलकट बटाट्याची भाजी**

कारले आणि बटाटा एकत्र खाणे विषारी नाही. मात्र बटाट्याची भाजी जास्त तेलात बनवली असेल तर संपूर्ण जेवण जड होऊ शकते. त्यामुळे पचनाचा त्रास होत असल्यास हे संयोजन कमी प्रमाणात घ्यावे.

फरसबी किंवा इतर जास्त फायबरच्या भाज्या

कारल्यामध्ये आधीच चांगल्या प्रमाणात फायबर असते. त्यासोबत मोठ्या प्रमाणात फायबरयुक्त भाज्या घेतल्यास संवेदनशील पचनशक्ती असलेल्या व्यक्तींना गॅस, पोट फुगणे किंवा पोटात कुरकुर होऊ शकते.

फुलकोबी, कोबीसारख्या भाज्या

या भाज्यांमुळे काही लोकांना नैसर्गिकरित्या गॅस होतो. कारल्यासोबत मोठ्या प्रमाणात खाल्ल्यास हा त्रास अधिक जाणवू शकतो.

**कच्च्या भाज्यांचे मोठे प्रमाण**

कारल्याची भाजी आणि त्यासोबत मोठ्या प्रमाणात कच्चा कांदा, काकडी किंवा इतर सलाड घेतल्यास काही संवेदनशील व्यक्तींना पोट फुगणे किंवा अपचन होऊ शकते, त्यामुळे पचनाचा त्रास होत असल्यास प्रमाण कमी ठेवणे योग्य.



# काचेच्या शोकेसमधील चमक पाहून भेसळीकडे दुर्लक्ष?

पान १ वरून

**दूध किती येते आणि दुग्धजन्य पदार्थ किती विकले जातात?**

शहरात दररोज प्रत्यक्ष किती दूध उपलब्ध होते? त्याच दूधापासून तयार होणारे पनीर, खवा, श्रीखंड, बासुंदी, पेढे, बंगला मिठाई, आईस्क्रिम, चहा, कॉफी यांसारखे दुधजन्य पदार्थ किती मोठ्या प्रमाणावर विकले जातात? याचा साधा ताळमेळही नागरिक विचारात घेत नाही हेच सर्वात मोठे आश्चर्य आहे. दुग्धजन्य पदार्थांसाठी लागणारे दूध कुठून येते? त्याची गुणवत्ता काय आहे? त्यांचे उत्पादन कोणत्या पद्धतीने केले जाते? याबाबत ग्राहकांनी जागरूक राहणे आवश्यक आहे. शहरातील काही स्वीट मार्टमध्ये पूर्वी मोठ्या प्रमाणावर दिसणारे काही दुग्धजन्य पदार्थ किंवा पनीर सध्या काही ठिकाणी उपलब्ध नसल्याचे नागरिकांच्या निदर्शनास येत आहे. मात्र, यामागील कारणांबाबत आता तरी नागरिकांनी निष्कर्ष काढणे गरजेचे आहे. संबंधित दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रेत्यांच्या पदार्थांच्या एकूणच दर्जाची शाहनिशा करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने नियमित तपासण्या आणि दोषींवर कठोर कारवायांची अत्याधिक आवश्यकता आहे. नागरिक त्यासाठी आता आग्रही मागणी करू लागले आहेत.

**काचेची चमक की अन्नाची गुणवत्ता?**

काचेचे स्वच्छ शोकेस, आकर्षक रोषणाई, चमकदार मांडणी आणि सुंदर पॅकिंग पाहून पदार्थ सुरक्षित असल्याचे समजणे हा ग्राहकांचा मोठा गैरसमज ठरू शकतो. दुकान किती सुंदर आहे, यापेक्षा पदार्थ कसा तयार केला आहे? त्यातील पदार्थांचा दर्जा किती सकस व आरोग्यदायी आहे? हे तपासून पाहणे अधिक महत्त्वाचे आहे.'पदार्थ खाल्ला आणि काही झाले नाही, म्हणजे तो चांगलाच आहे', हा समजही धोकादायक आहे. काही पदार्थ पटकन रिॲक्शन देतात. त्यामुळे फूड पॉयझनिंगसारखे प्रकार पाहवयास मिळतात. तर काही पदार्थ स्लोपॉयझनिंगसारखे असतात. ते मानवी शरीराला आतून पोखरतात. त्या पदार्थांमुळे हळूहळू शरीरात विभिन्न प्रकारचे रोग तथा आजार बळावतात. विशेषत्वाने पचन संस्थेवर त्यांचा अधिक विपरित परिणाम होतो. पूर्वी अन्न व औषध प्रशासनाचा कारभार म्हणजे आनंदी आनंद होता. आता मात्र सदर विभागाला खमके नेतृत्व लाभले आहे. त्यामुळे विभाग खळबळून जागा झाला आहे. तक्रारींच्या अनुषंगाने तात्काळ कारवाया सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर संशयास्पद पदार्थांबाबत प्रश्न विचारणे आणि आवश्यकता भासल्यास संबंधित यंत्रणेकडे तक्रार करणे गरजेचे आहे.

**'आपल्याला काय करायचे?' मानसिकता कधी बदलणार?**

फक्त अमळनेर तालुक्याचेच उदाहरण घ्यावयाचे म्हटल्यास येथे किती दुधाळ जनावरे आहेत? त्यांच्याद्वारे किती दूध उपलब्ध होते? तुलनेने घरगुती वापरासाठी व व्यावसायिकांना किती प्रमाणात दूध लागते याचा अंदाज नागरिकांना आजिबातच नाही असेही नाही. कोठे, कशात आणि किती भेसळ होते हे अनेकांना बऱ्यापैकी समजतेदेखील मात्र आपल्याला काय करायचे आहे? या मानसिकतेतेतून कोणी आवाज उचलत नाही. आता तरी ही मानसिकता बदलणे काळाची नितांत गरज आहे.

# ना दूध विकतात, ना विकत घेतात, भारतातील 'या' गावाबद्दल माहिती आहे का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शहरात बहुतांश लोक हे पॅकेटचे दूध विकत घेतात आणि ते पितात. मात्र, गावांत असे नसते, गावांमध्येही दूध खरेदी केले जाते. पण बऱ्याच ठिकाणी पॅकेटचे दूध नसते. तेथे लोक दुधासाठी किटली घेऊन जातात. मात्र, भारतात एक गाव असेही आहे जेथे कधीच दूध खरेदी केले जात नाही, ना ते विकले जाते. हो, हे खरे आहे. भारतातील या अनोख्या गावात दुधाची विक्री होत नाही, तर ते वाटले जाते. नव्हे तर या गावात आतापर्यंत कोणीही बाहेरून किंवा पॅकेटचे दूध विकत घेतलेले नाही. वाचून आश्चर्य वाटले ना, पण हे खरे आहे.

भारतातील हे अनोखे गाव तेलंगणातील आदिलाबाद जिल्ह्यात आहे. सदर जिल्ह्यातील ग्रामीण मंडळाच्या अल्लिकोरी ग्रामपंचायतीमध्ये पोट्टमलोड्डी हे गाव येते. विशेष म्हणजे या गावात फक्त ५० कुटुंबे राहतात. पण या छोट्याशा गावात २५० हून अधिक गायी आणि शेळ्या आहेत. गावकरी त्यांना केवळ जनावरे मानत नाही, तर ते त्यांची आपल्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणे काळजी घेतात. संपूर्ण गावाने तीन गुराखी नियुक्त केले असून ते या जनावरांना दररोज चरायला घेऊन जातात.



**गरजूंना वाटले जाते दूध**

सकाळी गुरांना चरण्यासाठी नेणे आणि सायंकाळी परत घेऊन येणे, हीच येथील दिनचर्या आहे. या गावाचे एक वैशिष्ट्य म्हणजे येथे गाईंपासून कितीही दूध मिळाले तर ते दूध केंद्रात नेले जात नाही, की बाजारात जाऊन विकलेही जात नाही. जर एखाद्या घरात दूध जास्त झाले असेल तर ते गरजूंना देऊन टाकण्यात येते, त्याचे वाटप केले जाते.

**आतापर्यंत कोणीही बाहेरून विकत आणले नाही दूध**

पोट्टमलोड्डी गावातील लोकांपैकी कोणीही आतापर्यंत एकदाही बाहेरून दूध किंवा दुधाचे पॅकेट विकत आणलेले नाही. कारण जेवढ्या दुधाची गरज असेल तेवढे दूध आधीच त्यांच्या घरात असते. जगभर दूध विकणे आणि विकत घेणे सुरू आहे. या पार्श्वभूमीवर दूध वाटून देणारे हे गाव निश्चितच कौतुकास्पद आहे. आजकालच्या जगात पशूंना केवळ उत्पन्नाचे साधन मानले जाते. मात्र, दुसरीकडे या गावात त्यांची घरातील सदस्यांप्रमाणे काळजी घेतली जाते. या गावचा सर्वांनीच आदर्श घेतल्यास भारत जणू गोकुळ होईल.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# आयएएस परीक्षेत अपयश, पहिला व्यवसाय बुडाला

## ॲमेझॉन अन् फ्लिपकार्टला घाम फोडून उभारला ९५ हजार कोटींचा बिझनेस





सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

देशातील सर्वात प्रतिष्ठित शिक्षण संस्था आयआयटी दिल्लीमधून शिक्षण पूर्ण केल्यानंतर जिथे बहुतेक तरुण परदेशात जाण्याचे किंवा मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये बक्कळ पगाराचे स्वप्न पाहतात तेथे एका तरुणाने देशातील सर्वांत कठीण मानली जाणारी यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून आयएएस अधिकारी बनण्याचा निर्णय घेतला. पण अनेक महिने पुस्तकांमध्ये रमून आणि कठोर परिश्रम करूनही स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. निराशेच्या गर्तेतून बाहेर पडून एका कॉर्पोरेट कंपनीत नोकरी सुरू केली. पण स्वतःची कंपनी सुरू करण्याची तळमळ कायम मनात होती.

**अपयश येऊनही खचले नाहीत अन् उभारली कोट्यवधींची कंपनी**

मग काय नोकरी सोडली आणि एक स्टार्टअप सुरू केला. पण दुर्दैवाने पहिला व्यवसाय काही महिन्यांतच सपशेल अपयशी ठरला. त्यानंतर आणखी एक धक्का बसला. मात्र, त्यांनी हार मानली नाही आणि आपल्या चुकांमधून शिकून नवीन मार्ग अवलंबला. आपल्या भूतकाळातील घेतलेल्या धाडसी निर्णयामुळे ९५ हजार कोटींची मोठी ई-कॉमर्स कंपनी उभी केली, जी आज ॲमेझॉन आणि फ्लिपकार्ट यांसारख्या जागतिक कंपन्यांनाही कडवी टक्कर देत आहे.

**आयआयटी ते मीशोपर्यंत प्रवास**

स्वप्न अन् अपयशाच्या या टप्प्यातून विदित अत्रेने यशाचा इतिहास घडविला. जे भारतातील सर्वांत लोकप्रिय सोशल ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म 'मीशो'चे सह-संस्थापक आणि सीईओ आहेत. २०१२ मध्ये विदित यांनी आयआयटी दिल्लीमधून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये पदवी पूर्ण केल्यानंतर एफएमसीजी क्षेत्रातील दिग्गज कंपनी आयटीसीमध्ये रुजू झाले आणि त्यानंतर लाइमरोड या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्ममध्ये सामील झाले, जेथे त्यांना भारतीय ई-कॉमर्स उद्योगाची सखोल माहिती मिळाली.

**अपयशातून धडा घेतला**

विदित यांनी परदेशी कंपन्यांचे अनुसरण करण्याऐवजी भारतातील लहान शहरांमध्येव्यवसाय कसा चालतो? हे समजून घ्यायचा प्रयत्न केला. २०१५ मध्ये विदित यांनी आणि त्यांचा आयआयटीमधील सहकारी संजीव बर्नवालने स्थानिक दुकानांमधील कपडे ऑनलाइन विकण्याच्या उद्देशाने फॅशनिअर नावाचे हायपरलोकल फॅशन ॲप सुरू केले, पण योग्य व्यवसाय मॉडेलचा अभाव आणि ग्राहकांच्या थंड प्रतिसादामुळे उपक्रम काही महिन्यांतच बंद पडला.

**मीशोचा जन्म कसा झाला?**

सुरूवातीच्या अपयशाने खचून जाण्याऐवजी विदित आणि संजीव यांनी जमिनीवरील वास्तवाचे पुनर्मूल्यांकन केले. या दरम्यान त्यांच्या लक्षात आले, की भारतातील लहान शहरांमधील गृहिणी आणि छोटे दुकानदार व्हॉट्सॲप व फेसबुकच्या माध्यमातून कपडे आणि वस्तूंची रिसेल करायचे. ही कल्पना मोठ्या प्रमाणावर राबविण्यासाठी डिसेंबर २०१५ मध्ये मीशो (मेरी शॉप)चा पाया घातला आणि असे व्यासपीठ तयार केले जेथे कोणीही शून्य गुंतवणुकीत आपला स्वतःचा रिसेल व्यवसाय सुरू केला.

**सिलिकॉन व्हॅलीतून मिळाले यश**

२०१६ मध्ये मीशोच्या आकर्षक कार्यपद्धतीला ओळखून प्रसिद्ध अमेरिकन सिलिकॉन व्हॅली ॲक्सिलरेटर, वाय कॉम्बिनेटरने मीशोची मेंटॉरशीप प्रोग्रॅमसाठी निवड केली. त्यावेळी भारतातून निवड झालेल्या मोजक्या स्टार्टअपपैकी मीशो एक होता आणि त्यानंतर मीशोने मागे वळून पाहिले नाही. कंपनीच्या व्यवसाय मॉडेलने प्रभावित होऊन सॉफ्टबँक, मेटा, प्रोसस आणि सेक्वोया यांसारख्या आघाडीच्या जागतिक गुंतवणूकदारांनी लाखो डॉलर्सची गुंतवणूक केली.

**मीशोच्या यशाची प्रमुख रणनीती काय?**

एकीकडे ॲमेझॉन आणि फ्लिपकार्टने मोठ्या महानगरांमधील श्रीमंत ग्राहकांना लक्ष्य केले, तर मीशोने छोटी शहरे, गावे आणि ग्रामीण भारतातील मध्यमवर्गाला लक्ष्य केले. मिशोने छोट्या दुकान किंवा विक्रेत्यांकडून कोणतेही कमिशन न आकारणीचे क्रांतिकारक धोरण अवलंबले. ज्यामुळे कमिशनच्या भीतीमुळे ऑनलाइन बाजारात येण्यास संकोच करणारे लाखो छोटे दुकानदार मीशोमध्ये सामील झाले.

मीशोने लाखो घरगुती गृहिणींना resaleद्वारे कमाईचे व्यासपीठे उपलब्ध करून दिले, ज्यामुळे तळागाळापर्यंत ब्रँडची तोंडी प्रसिद्धी झाली.

**९५ हजार कोटींचे साम्राज्य**

अशाप्रकारे आजच्या काळात मिशो केवळ रिसेलिंग ॲप नाही, तर मोठे डायरेक्ट-टू-कन्झ्युमर - डी२सी- ई-कॉमर्स मार्केटप्लेस बनले आहे. मीशोवर वार्षिक १५ कोटी सक्रिय व्यवहार वापरकर्ते असून मीशो देशातील ८० टक्क्यांपेक्षा जास्त पिन कोडवर डिलिव्हरी करते. यासह कंपनीने ९५ हजार कोटींहून अधिक मूल्यांकन प्राप्त केले आहे.

# चांदीचे फायदे जाणून घ्याल तर सोनेही विसरून जाल!



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतीय संस्कृतीत चांदीचा वापर दागिने, भांडी आणि पूजेच्या वस्तूंसाठी प्राचीन काळापासून केला जातो. चांदीला शुद्धता आणि शुभतेचे प्रतीक मानले जाते.

**चांदीमध्ये जंतुरोधक गुणधर्म**

चांदीच्या आयनमध्ये काही प्रकारच्या सूक्ष्मजीवांच्या वाढीवर परिणाम करणारे जंतुरोधक गुणधर्म आढळतात. याच कारणामुळे वैद्यकीय क्षेत्रात चांदीच्या काही विशिष्ट संयुगांचा नियंत्रित वापर केला जातो.

**चांदीच्या भांड्यांचा पारंपरिक वापर**

